# शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर

*(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)*

## पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियामध्ये सर्व विद्यार्थी पालकांचे हार्दिक स्वागत

## १० वी नंतर पॉलिटेक्निकच का ?

१) पॉलिटेक्निक नंतर ज्युनिअर म्हणुन प्रायव्हेट व सरकारी नोकरी मिळू शकते किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो.

२) पॉलिटेक्निक नंतर इंजिनिअरींग करायचे असल्यास थेट द्वितीय वर्षाला प्रवेश मिळतो.

३) १२ वी करून इंजिनिअरींग करायचे असल्यास राष्ट्रीय/राज्य स्तरावरील प्रवेश परीक्षा (CET/JEE mains) द्यावी लागते, त्या परीक्षेकरिता पालकांना लाखो रुपये क्लासेस करीता खर्च करावे लागतात. परंतु पॉलिटेक्निक साठी कुठल्याही प्रवेश परीक्षेची आवश्यकता नाही.

४) १२ वी करून इंजिनिअरींग करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या तुलनेत खुपच कमी खर्च पॉलिटेक्निक करून इंजिनिअरींग करण्यासाठी लागतो. प्रवेश परीक्षा CET/JEE चा खर्च तसेच Diploma नंतर Direct 2$^{nd}$ Year Degree प्रवेश मिळत असल्याने प्रथम वर्ष डिग्रीची कमीत कमी एक लाख रूपये फी वाचते. डिग्रीला प्रथम वर्षी आवडीची शाखा मिळत नाही कारण १२ वी चे व CET/JEE चे असे दोन्ही मार्क धरून डिग्री शाखेत प्रवेश दिला जातो. तर डिप्लोमा ला १0वीच्याच मार्कावर शाखानिवड तुमच्या मनाप्रमाणे आवडीनुसार हमखास मिळतेच.

५) १२ वी करून इंजिनिअरींग करण्यासाठी (२+४) असे ६ वर्षे लागतात तेवढाच वेळ पॉलिटेक्निक करून इंजिनिअरींग करण्यासाठी (३+३) असे ६ वर्षे लागतात.

६) १२ वी PCM ग्रुप मध्ये ५0/४५ टक्क्यांपेक्षा कमी मार्कस् मिळाले तर इंजिनिअरींगला प्रवेश मिळू शकत नाही. त्यामुळे परत पॉलिटेक्निकला प्रवेश घ्यावा लागतो आणि ११ वी व १२ वी च्या शिक्षणाचा खर्च वाया जातो.

७) पॉलिटेक्निक केल्यानंतर इंजिनिअरींगचा ७0 टक्के अभ्यासक्रम पॉलिटेक्निक मध्ये अभ्यासला जातो त्यामुळे इंजिनिअरींग (B.E.) करणे खुपच सोपे जाते.

८) सरकारी किंवा खाजगी क्षेत्रातील उद्योग धंद्यातील कंपन्यासाठी पॉलिटेक्निक व इंजिनिअरींग दोनही कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांना भरती प्रवेश प्रक्रिया सोपी जाते. तसेच महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू द्वारे नामांकित कंपन्यात नोकरीची १00% हमी.

९) कंपनीत नोकरी करत असतांना बी.ई. ला ही प्रवेश घेता येतो व पुढील शिक्षण पुर्ण करता येते.

१०) वरील सर्व फायदे बघता १० वी नंतर आपल्या जवळच्या गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकला प्रवेश घेणे हा अती उत्तम पर्याय आहे.

११) थेट द्वितीय वर्ष पात्रता १२ Science/ITI/MCVC पास

१२) ॲडमिशन लिंक :- **https://www.dte.maharashtra.org.in**

१३) SC/ST/NT/OBC/SBC साठी शिष्यवृत्ती व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी. सवलत उपलब्ध.